**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०९ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **अमरावती येथे टेक्सटाइल पार्कच्या उभारणीमुळे कापूस शेतकऱ्यांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रचारसभेत प्रतिपादन.**
2. **'एक है तो सुरक्षित है' आणि कटेंगे तो बटेंगे अशा घोषणा देऊन भाजप फुटीरतावादी राजकारण करत असल्याचा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा नागपूरमध्ये आरोप.**
3. **'व्होटेथॉन' च्या माध्यमातून "नागपूरकर, मतदान कर' चा संदेश- मतदान जनजागृतीसाठी धावले नागपूरकर.**
4. **सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या अधिकृतपणे निवृत्त होणार; न्यायमूर्ती संजीव खन्ना स्वीकारणार पदभार.**

पंतप्रधान अकोला सभा

महाराष्ट्रानं २०१४ ते २०२४ अशी दहा वर्षं भाजपाला सातत्यानं संधी दिली. महाराष्ट्रवासीयांची देशभक्ती, राजकीय समज आणि दूरदृष्टी यातून दिसते, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अकोला इथं एका प्रचारसभेत ते बोलत होते. महाराष्ट्राच्या नागरिकांनी दाखवलेल्या या विश्वासामुळे महाराष्ट्राची सेवा करण्यात वेगळंच सुख मिळतं, असंही ते म्हणाले. केंद्र सरकारनं मराठी भाषेला दिलेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव केला आहे, असंही ते म्हणाले. राज्यात अमरावतीमध्ये टेक्सटाईल पार्कच्या उभारणीमुळे कापूस शेतकऱ्यांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***कपास किसानों की आय बढे इसके लिए उद्योग और इंफ्रास्ट्रक्चर दोनों को बढ़ावा दिया जा रहा है। मैंने महाराष्ट्र में टेक्सटाइल पार्क का शिलान्यास किया है, टेक्सटाइल पार्क से महाराष्ट्र में कपास किसानों के लिए समृद्धि के नए अवसर तैयार होंगे।***

विदर्भातील त्यांच्या पहिल्या राजकीय प्रचार सभेला संबोधित करताना अकोला येथे मोदी यांनी विदर्भातील सिंचन प्रकल्पांचे महत्त्व अधोरेखित केले. पूर्वीच्या महाविकास आघाडीने महत्त्वाकांक्षी सिंचन रखडवल्याचे ते म्हणाले. राज्यात महायुतीचे पुनरागमन झाल्यानंतर वैनगंगा नळगंगा आणि पैनगंगा यांना जोडण्याच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली असून या प्रकल्पामुळे नागपूर आणि वर्धा जिल्ह्यासह पश्चिम विदर्भातील सर्व ५ जिल्हे सिंचनाखाली येणार असल्याचेही त्यांनी सांगितलं. महाविकास आघाडी आणि काँग्रेसवर त्यांनी भ्रष्टाचाराचा, घराणेशाहीचा आरोप केला आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी पुन्हा एकदा राज्यात महायुतीचं सरकार निवडून देण्याची विनंती मतदारांना केली.

मल्लिकार्जुन खर्गे

'एक है तो सुरक्षित है' आणि 'कटेंगे तो बटेंगे' अशा घोषणा देऊन भाजप फुटीरतावादी राजकारण करत आहे, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नागपुरात पत्रकार परिषदेत केला. खरगे म्हणाले की, देशाच्या एकात्मतेसाठी आणि अखंडतेसाठी कॉंगेसच्या नेत्यांनी बलिदान दिले.

***अरे हम देश को एक रखने के लिए तो हमारे कांग्रेस पार्टी के नेताओं ने अपनी जान निछावार कर दी, मारते भी आप ही हो और कहते ऊपर से "बटेंगे तो कटेंगे" । देश को एक रखने वाले ये बात कभी नहीं बोलते । हम एक है. राजीव गांधी जी ने अपनी जान नहीं दी देश के एकता के लिए ? आपके पास कौन ऐसा महापुरुष है, मुझे बताओ देश के लिए, एकता के लिए अपनी जान दिया है ?***

'खोटं बोला पण रेटून बोला' अशी प्रवृत्ती पंतप्रधानांची असल्याची टीका देखील खर्गे यांनी केली. नागपूरच्या मिहानमध्ये आलेला एअरबसचा प्रोजेक्ट हा गुजरातला पळवण्यात आला, असे देखील खरगे यांनी सांगितलं. काँग्रेसच्या महालक्ष्मी योजना, कृषी समृद्धी, आरोग्य विमा, मोफत प्रवास अशा पाच गॅरंटीची देखील त्यांनी यावेळी माहिती दिली. कल्याणकारी योजनांच्या तरतुदी सांगून कर्नाटक सरकारच्या अर्थसंकल्पीय तरतुदींवरील आरोपांचंही त्यांनी खंडन केलं. काँग्रेसशासित राज्यांकडून हमीभावाची पूर्तता केली जात असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तत्पूर्वी, आपल्या नागपूर दौऱ्यात खरगे यांनी नागपुरातील दीक्षाभूमीला भेट दिली आणि दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला आदरांजली वाहिली. खरगे यांनी आज दुपारी अमरावतीच्या तिवसा येथे काँग्रेस उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या तसेच जिल्हयातील महाविकास आघाडीच्या उमेदवार यांच्या प्रचारसभेला संबोधित केले. या सभेत सुद्धा त्यांनी भाजपच्या फुटीरतावादी राजकारणापासून दूर राहण्याचे आवाहन केले. दरम्यान, आज सायंकाळी सव्वासातला उत्तर नागपुरात काँग्रेसचे उमेदवार डॉ.नितीन राऊत यांच्या प्रचाररॅलीला खरगे संबोधित करतील.

उद्धव ठाकरे सभा

महाविकास आघाडीच्या सरकारच्या कालावधीत साडे सहा लाख कोटींचे सामंजस्य करार करून राज्यात उद्योग आणले, मात्र महायुती सरकारनं सर्व उद्योग गुजरातला नेले, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. ते आज नांदेड जिल्हयात लोहा-कंधार मतदारसंघातल्या प्रचारसभेत बोलत होते. महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर महिलांना दरमहा तीन हजार रुपये मदत देणार, महिलांसाठी महिला अधिकारी आणि कर्मचारी असणारी वेगळी पोलीस ठाणी राज्यभरात उभारणार, अशी आश्वासनं ठाकरे यांनी या वेळी दिली. महायुतीच्या नेत्यांना निवडणुकीच्या काळात शेतकऱ्याची आठवण झाली असून हे सरकार महाराष्ट्रद्रोही असल्याचा आरोपही त्यांनी केला. महायुती

सरकारच्या काळात सोयाबीन, कापूस, डाळ, कांदा या सर्वांचे हमीभाव पडले. त्यामुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालं, असं ठाकरे आज एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले. नरेंद्र मोदी यांच्या गेल्या दहा वर्षांच्या गैरकारभाराबाबत लोक आता प्रश्न विचारत असून राज्यात महाविकास आघाडीचं सरकार येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज ठाकरे

आपल्याकडील तरुण-तरुणीमध्ये कमतरता नाही, राज्यकर्ते आणि राजकारण्यांच्या मेंदूत कमतरता आहे, अशी टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यवतमाळच्या उमरखेडमध्ये केली. मनसे उमेदवार राजेंद्र नगरधने यांच्या प्रचारार्थ त्यांनी सभा घेतली. यावेळी मला राजसत्तेच्या खुर्चीचा मोह नाही, असे त्यांनी सांगितले.

प्रकाश आंबेडकर

भाजप आणि काँग्रेस दोघे एकसारखेच आहेत. हिंदू कोड बिल निर्माण करताना पहिला विरोधक हिंदू महासभा, आरएसएस आणि साधू संतांना पुढं करण्यात आलं. मात्र, साधूसंतांशी जेव्हा बाबासाहेब बोलले तेव्हा बाबासाहेबांना साधू संतांनी पाठिंबा दिला. संसदेत जे संविधान आहे ज्यावर सर्वांच्या सह्या आहेत, त्याचा रंग काय, हे फडणवीस यांनी सांगावे, हे माझं चॅलेंज आहे,असं ते म्हणतात. राहुल गांधी जे संविधान घेऊन फिरतात, ते भाजपनेचं प्रिंट केलं आहे, असा थेट आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज सोलापूर येथे पत्रकार परिषदेत केला आहे. मुंबईतील मराठी माणसाची लोकसंख्या कमी करायला जबाबदार शिवसेना आहे. मी मुंबईकर आहे. ज्याला कोणाला चॅलेंज करायचं असेल त्यांनी करावं, मुंबई महापालिकेत 90 टक्के कॉन्ट्रॅक्टर अमराठी आहेत, असा थेट आरोपही  आंबेडकर यांनी केला आहे.

आढावा विधानसभा मतदारसंघाचा

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरून प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

व्होटेथॉन

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये नागपूर शहरातील मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता 'मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग' अर्थात स्वीप कार्यक्रम अंतर्गत नागपूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित  'व्होटेथॉन' मतदार जनजागृती दौड स्पर्धेला नागपूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला. या माध्यमातून 'नागपूरकर, मतदान कर' असा संदेश देण्यात आला. नागपुरातील धंतोली स्थित यशवंत स्टेडियम येथे आयोजित 'व्होटेथॉन' मतदार

जनजागृती दौड 5 किलोमीटर आणि फन रनला नागपूरचे निवडणूक निरीक्षक भोर सिंग, सुनील कुमार, पवनकुमार सिन्हा, नागपूर पोलीस आयुक्त डॉ.रवींद्रकुमार सिंगल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी हिरवा झेंडा दाखवीत सुरुवात केली. यावेळी मतदारांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आवाहन केले.

***पूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळेस २० तारखेला मतदान होणार आहे. त्यासाठी नागपूरमध्ये जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी आम्ही 'मिशन डिस्टिंक्शन' नावाची एक मोहीम देत आहे. ज्याच्यामधे नागपूरमध्ये येत्या 20 तारखेला कमीत-कमी 75 टक्के मतदान व्हायला हवं, याच आवाहन आम्ही सगळ्यांना करत आहे. त्यासाठी 75 प्रकारच्या ऍक्टिव्हिटीज आम्ही पुढच्या पंधरा दिवसांमध्ये आम्ही वोटिंग होतपर्यंत आम्ही ठेवणार आहे. आज त्याच्या अनुषंगाने "व्होटेथॉन" त्याच्यामध्ये 2 किलोमीटर रन, 5 किलोमीटर रन, फॅन्सी ड्रेस अशा सगळ्या इवेंट्स आम्ही ठेवल्या होत्या आणि पुढे बाईक रॅली, रील मेकिंग कॉम्पिटिशन प्रतिज्ञा घेणे सगळ्या ऍक्टिव्हिटीज आम्ही ठेवलेल्या आहेत.***

यावेळी बोलताना पोलीस आयुक्त डॉ.रवींद्रकुमार सिंघल यांनी नागरिकांनी मतदानासाठी पुढे येत, मी स्वतः मतदान करणार आणि इतरांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करणार, असा प्रण घ्यावा, असे आवाहन केले, तर मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, नागपूर शहर नेहमीच चांगल्या कामांमध्ये प्रथम येण्यासाठी अग्रेसर राहिलं आहे. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत देखील जास्तीत जास्त मतदान करून राज्यातून प्रथम येण्याचा प्रयत्न नागपूरकरांनी करावा.

सरन्यायाधीश

सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या रविवारी अधिकृतपणे निवृत्त होणार आहेत. त्यानंतर न्यायमूर्ती संजीव खन्ना देशाचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा काल न्यायालयात शेवटचा दिवस होता. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या निकालांमध्ये अयोध्या जमीन वाद, दोन प्रौढांनी सहमतीने ठेवलेल्या समलिंगी संबंधांना मान्यता आणि अविवाहित महिलांना गर्भपाताचा अधिकार यांचा समावेश आहे. त्यांचे हे निर्णय समाज आणि राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे आहेत.

******